## संपादकीय

# पूर्वेचा सूर्य आणि सनातनचा दक्षिण विजय



**पश्चिम बंगालमधील परिवर्तनाचा झंझावात, आसाममधील राष्ट्रवादाची हॅटट्रिक आणि तामिळनाडूत सनातन धर्माचा झालेला विजय, हे निकाल म्हणजे केवळ सत्तापालट नसून देशाच्या राजकारणातील छद्म-धर्मनिरपेक्षतेच्या अंताची अधिकृत घोषणा आहे.**

भारताच्या राजकारणात आजचा सूर्य एक नवी आशा आणि प्रखर राष्ट्रवादाचा प्रकाश घेऊन उगवला आहे. बंगालमध्ये भारतीय जनता पक्षाने मिळवलेला ऐतिहासिक विजय हा बंगालच्या त्या महान सांस्कृतिक आणि क्रांतीकारी वारशाचा खऱ्या अर्थाने झालेला पुनर्जन्म आहे. ज्या बंगालने देशाला वंदे मातरम् दिले, ज्या मातीने डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यासारखे राष्ट्रपुरुष जन्माला घातले, त्या मातीला गेली अनेक दशके डाव्यांच्या आणि त्यानंतर ममता बॅनर्जींच्या तृणमूल काँग्रेसच्या रक्तरंजित राजकारणाने जकडून ठेवले होते. आजचा निकाल हा त्या जकड्यातून बंगालची झालेली मुक्तता आहे. ममतांच्या पराभवाचे विश्लेषण करताना तथाकथित पुरोगामी आणि लिबरल गँग आता अनेक तांत्रिक कारणे शोधेल, परंतु या पराभवाचे मर्म हे ममतांच्या अहंकारी तुष्टीकरणात आणि हिंदूद्वेषाच्या उबळकीत दडलेले आहे. ज्या डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींनी एक विधान, एक निशान, एक प्रधानचा नारा देऊन काश्मीर वाचवला, त्याच मुखर्जींच्या बंगालमध्ये जय श्रीरामच्या घोषणांना गुन्हेगारी ठरवण्याचे पातक ममतांनी केले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ज्या आझाद हिंदचे स्वप्न पाहिले होते, तिथे घुसखोरांना पायघड्या घालून आणि सीमेवरील जिल्ह्यांचे जनसांख्यिकीय स्वरूप बदलून ममतांनी बंगालचा आत्मा दुखावला होता. आजच्या विजयाने श्यामाप्रसाद मुखर्जींच्या बलिदानाचे सार्थक झाले असून, बंगाल पुन्हा एकदा राष्ट्रीय प्रवाहात सामील झाला आहे. खेला होबेच्या वल्गना करणाऱ्यांना मतदारांनी खेळातूनच बाद केले आहे. ईशान्य भारताचे प्रवेशद्वार असलेल्या आसामने तर सलग तिसऱ्यांदा भाजपला कौल देऊन नवा इतिहास रचला आहे. मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांचे नेतृत्व म्हणजे ईशान्येतील घुसखोरी आणि फुटीरतावादाला मिळालेले चोख उत्तर आहे. काँग्रेसने ज्या ईशान्येला आपली जहागीर मानले होते, तिथे आता राष्ट्रवादाचे कमळ पूर्ण ताकदीने फुलले आहे. मदरशांबाबत घेतलेले धाडसी निर्णय आणि बेकायदेशीर अतिक्रमणांविरुद्ध चालवलेला बुलडोझर, हे या विजयाचे खरे शिल्पकार आहेत. आसामची ही हॅटट्रिक म्हणजे दिल्लीतील तुकडे-तुकडे गँगच्या थोबाडीत मारलेली सणसणीत चपराक आहे. परंतु, या निवडणुकीतील सर्वात मोठा धमाका दक्षिणेत झाला आहे. तामिळनाडूमध्ये द्रमुकचा झालेला दारूण पराभव हा सनातन धर्मावर विखारी टीका करणाऱ्या मानसिकतेचा झालेला अंत्यसंस्कार आहे. उदयनिधी यांनी सनातन धर्माची तुलना डेंग्यू आणि मलेरियाशी करून तामिळ जनतेच्या धार्मिक भावनांना डिवचले होते. तामिळनाडू ही संतांची आणि अलवारांची भूमी आहे, हे विसरण्याची चूक स्टॅलिन यांना महागात पडली आहे. द्रविड राजकारणाच्या नावाखाली हिंदू धर्माचा द्वेष करणे आता तामिळ जनतेला मान्य नाही, हेच या निकालाने सिद्ध केले आहे. घराणेशाही आणि अहंकारी सत्तेचा फुगा तामिळ मतदारांनी मतपेटीतून फोडला आहे. केरळमध्येही प्रस्थापित डाव्यांच्या लाल किल्ल्याला भगवे खिंडार पडले आहे. ज्या प्रकारे ख्रिश्चन समुदायाने लव्ह जिहाद आणि कट्टरतावादाच्या प्रश्नावर भाजपला साथ दिली, ते पाहता केरळच्या राजकारणातील एक नवे समीकरण आकाराला येत आहे. डाव्यांची वैचारिक दिवाळखोरी आता स्पष्ट झाली असून, तिथला सुशिक्षित तरुण आता विकासाच्या आणि राष्ट्रवादाच्या पर्यायाकडे वळत आहे. हे निकाल स्पष्टपणे सांगत आहेत की, भारताचा मतदार आता प्रगल्भ झाला आहे. त्याला आता मोफतच्या योजना नकोत, तर त्याला आपल्या संस्कृतीचा, आपल्या धर्माचा आणि आपल्या राष्ट्रपुरुषांचा सन्मान करणारी राजवट हवी आहे. मोदींच्या नेतृत्वाखालील भारताने जी झेप घेतली आहे, त्याची ही पोचपावती आहे. ज्या नेत्यांनी भारताच्या एकात्मतेसाठी आपले आयुष्य वेचले, त्या श्यामाप्रसाद मुखर्जी आणि नेताजींच्या विचारांचा हा विजय आहे. हा निकाल म्हणजे पुरोगामीत्वाच्या नावाखाली लपलेल्या ढोंगीपणाचा आणि वैचारिक दहशतवादाचा वध आहे. भारताचा पूर्व आणि दक्षिण भाग आता एकाच सुरात भारत माता की जय म्हणत आहे. हा लोकशाहीचा उत्सव आहे, हा सत्याचा विजय आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, हा या मातीतील सनातन संस्कृतीचा आणि अखंड भारताच्या संकल्पाचा विजय आहे. आता केवळ मजहबी राजकारण चालणार नाही, तर या देशात फक्त राष्ट्रवादच चालेल, हा संदेश या निकालांनी दिला आहे.

# द्रविडी राजकारणातील 'विजय' आणि सनातनचा हुंकार



दक्षिण भारताच्या राजकारणाचे स्वरूप नेहमीच सिनेपडद्याच्या ग्लॅमरशी जोडलेले राहिले आहे. एमजीआर, जयललिता आणि करुणानिधी यांच्यानंतर निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी अनेक चित्रपट तारे मैदानात उतरले, पण नुकताच ज्या प्रकारे 'थलपथी' विजयने आपल्या 'तमिळगा वेत्री कळघम' (टीव्हीके) या पक्षाचा शंखनाद केला, त्याने दिल्लीपासून चेन्नईपर्यंतच्या राजकीय विश्लेषकांची गणिते बिघडवली आहेत. विजयचा हा प्रवेश केवळ एका नव्या पक्षाची स्थापना नाही, तर तो दशकानुदशके तमिळनाडूच्या मानगुटीवर बसलेल्या द्रमुकच्या द्वेषमूलक आणि घराणेशाहीच्या राजकारणाला मिळालेला एक 'सिनेमॅटिक' पण तितकाच गंभीर धक्का आहे.

विजयने आपल्या पहिल्याच मेळाव्यात ज्या प्रकारे 'द्रविडी राष्ट्रवाद' आणि 'तामिळ राष्ट्रवाद' या दोन डोळ्यांच्या संकल्पना मांडल्या, त्याकडे बारकाईने पाहण्याची गरज आहे. हा निकाल म्हणजे तमिळनाडूच्या राजकीय भूमीत आता केवळ 'नास्तिक' आणि 'हिंदूद्वेष्टी' पोपटपंची चालणार नाही, याचे संकेत आहेत. विजयने आपल्या भाषणात पेरियार यांचा उल्लेख केला असला तरी, त्याने ज्या प्रकारे 'धर्मनिरपेक्ष सामाजिक न्याय' आणि 'राष्ट्रवादा'चा पुकारा केला, ते पाहता हा नेता केवळ जुन्याच मार्गावरून चालणार नाही, हे स्पष्ट होते. पेरियार यांचे नाव घेतानाच त्याने लोकांच्या धार्मिक भावनांचा सन्मान करण्याची जी भाषा वापरली, ती स्टॅलिन आणि कंपनीला झोंबणारी आहे.

द्रमुक आणि विशेषतः उदयनिधी स्टॅलिन यांनी 'सनातन धर्मा'ची तुलना डेंग्यू आणि मलेरियाशी करून जो उन्माद निर्माण केला होता, त्याला तमिळ जनतेच्या मनात कमालीचा रोष होता. विजयने आपल्या पहिल्याच भाषणात ज्या पद्धतीने सर्वांना सोबत घेऊन जाण्याची भूमिका मांडली, ती एक प्रकारे 'सनातन' विरोधी मांडणीला दिलेली बगल आहे. तमिळनाडू ही संतांची भूमी आहे, तिथे कपाळावर विभूती लावणाऱ्याला आणि मंदिरात जाणाऱ्याला 'मागास' ठरवण्याचे जे षड्यंत्र द्रमुकने रचले होते, त्या विरोधात आता एक तरुण नेतृत्व उभे राहत आहे. विजयने आपल्या भाषणात भ्रष्टाचाराचा आणि कौटुंबिक राजकारणाचा जो निषेध केला, तो थेट गोपाळपुरमच्या राजवाड्यावर केलेला प्रहार आहे.

अण्णा द्रमुकच्या पडझडीनंतर तमिळनाडूमध्ये निर्माण झालेली पोकळी भाजपने आपल्या प्रखर राष्ट्रवादाने भरून काढण्याचा प्रयत्न केला आहे. आता विजयच्या रूपाने तिथे एक असा चेहरा आला आहे, जो तमिळ अस्मितेची भाषा तर करतोच, पण त्याच वेळी तो आक्रमक हिंदुत्वाचा तिरस्कार न करता 'सर्वसमावेशकता' जपण्याचे नाटक किंवा प्रयत्न करत आहे. विजयची ही भूमिका भाजपसाठी धोका आहे की संधी, याचे उत्तर काळच देईल; परंतु एक गोष्ट निश्चित की, यामुळे द्रमुकच्या हक्काच्या व्होट बँकेला मोठे खिंडार पडणार आहे. तमिळ तरुणाई, जी आता केवळ सिनेमापुरती मर्यादित राहिलेली नाही, तिला आता घराणेशाहीच्या पलीकडे जाणारा पर्याय हवा आहे.

विजयचा हा उदय म्हणजे केवळ एका दाक्षिणात्य अभिनेत्याची महत्त्वाकांक्षा नसून, तो द्रविडी राजकारणाच्या तथाकथित 'पुरोगामी' ढाच्याला बसलेला तडा आहे. तमिळनाडूत आता 'कडवुल' (देव) मानणाऱ्यांची संख्या कमी नाही आणि त्यांना सार्वजनिकरीत्या अपमानित करण्याचे दिवस आता संपत आले आहेत.

> » 'विजय' नावाच्या अभिनेत्याने ज्या प्रकारे शड्डू ठोकला आहे, त्याने केवळ द्रमुकच्या घराणेशाहीलाच नव्हे, तर तथाकथित द्रविडी अस्मितेच्या कालबाह्य झालेल्या कल्पनांनाही एक मोठे आव्हान दिले आहे.

विजयने ज्या प्रकारे आपल्या पक्षाचा झेंडा आणि बोधचिन्ह अनावरण केले, त्यातून त्याने एका नव्या तमिळ स्वाभिमानाची मांडणी केली आहे. हा स्वाभिमान भारताच्या मुख्य प्रवाहाशी जोडलेला असेल की पुन्हा एकदा फुटीरतावादाच्या जवळ जाणारा असेल, हे अद्याप धूसर असले तरी, त्याने भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर केलेली कोंडी द्रमुकसाठी डोकेदुखी ठरणार आहे.

हे राजकारण आहे आणि इथे 'सिनेमॅटिक क्लायमॅक्स' सारखे विजय मिळवणे इतके सोपे नसते. पडद्यावर शंभर जणांना मारणारा नायक जेव्हा मतदानाच्या मैदानात उतरतो, तेव्हा त्याला जातीय समीकरणे, प्रशासकीय अनुभव आणि संघटनात्मक बांधणी या आघाड्यांवर लढावे लागते. विजयचा प्रवास आता सुरू झाला आहे. त्याने मांडलेली विचारधारा ही द्रमुकच्या विरोधात असली तरी ती भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रवादाशी कुठे मिळतीजुळती आहे का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

हा 'विजय' म्हणजे जुन्या, गंजलेल्या आणि द्वेषमूलक द्रविडी विचारांच्या अंताची नांदी असू शकते. आता केवळ पेरियार यांच्या नावाने मते मागण्याचे दिवस गेले आहेत. आता तमिळ जनतेला विकास, पारदर्शकता आणि आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगणारा नेता हवा आहे. विजयने हा मार्ग निवडला तर तो खऱ्या अर्थाने 'विजेता' ठरेल, अन्यथा तोही इतिहासाच्या पानात विरून गेलेला एखादा दुसरा अभिनेता ठरेल. पण सध्या तरी, त्याने द्रमुकच्या छाताडावर धडधड निर्माण केली आहे, हेच या निकालाचे मोठे यश आहे.

# हिंजवडी मेट्रोचा पहिला टप्पा मेअखेर सुरू?

## माण-हिंजवडी ते बालेवाडी हा पहिला टप्पा लवकरच खुला होणार

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पुणे महानगर प्रदेशातील वाहतूक कोंडीला दिलासा देणाऱ्या हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो प्रकल्पाला वेग आला असून, माण-हिंजवडी ते बालेवाडी हा पहिला टप्पा येत्या ३१ मेपर्यंत प्रवाशांसाठी खुला होण्याची शक्यता आहे. अंतिम टप्प्यातील कामे युद्धपातळीवर सुरू आहेत.

हिंजवडी, वाकड आणि बालेवाडी परिसरात सध्या तीव्र वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. मेट्रो सेवा सुरू झाल्यानंतर सार्वजनिक वाहतूक सक्षम होऊन खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे शहरातील वाहतूक



व्यवस्थेला मोठा दिलासा मिळणार आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील बहुतांश काम पूर्ण झाले असून, उर्वरित मार्गाचे कामही वेगाने सुरू आहे. संपूर्ण हिंजवडी ते शिवाजीनगर मार्ग कार्यान्वित झाल्यास पुण्यातील सार्वजनिक वाहतुकीत मोठा बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि टाटा समूह यांच्यात १५ मे रोजी उच्चस्तरीय बैठक होणार असून, त्यात प्रकल्पाचा आढावा घेऊन मेट्रो सुरू करण्याच्या अंतिम तारखेवर निर्णय अपेक्षित आहे. या बैठकीत सुरक्षा मानके, तांत्रिक बाबी आणि कामाची प्रगती यांची सखोल तपासणी केली जाणार आहे. प्रशासनाचा कल जूनपर्यंत प्रतीक्षा न करता मे महिन्यातच सेवा सुरू करण्याकडे असल्याचे दिसत आहे. सर्व यंत्रणा वेळेत तयार झाल्यास ३१ मे ही तारीख निश्चित होण्याची शक्यता आहे. माण-हिंजवडी ते बालेवाडी दरम्यान १२ स्थानकांचे काम सुमारे ९५% पूर्ण झाली असून, किरकोळ दुरुस्ती व सजावटीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. तांत्रिक चाचण्या व सुरक्षा तपासणी सुरू असून, प्रवासी सुविधांची पडताळणी वेगाने सुरू आहे. हिंजवडी आयटी पार्क परिसरातील दररोजच्या वाहतूक कोंडीवर हा प्रकल्प प्रभावी उपाय ठरणार असून, आयटी कर्मचाऱ्यांचा प्रवास वेळ कमी होणार आहे. तसेच रस्त्यांवरील वाहनांची संख्या घटून प्रदूषणातही घट होण्याची शक्यता आहे.

# वायसीएम रुग्णालयाला आयुक्तांची अचानक भेट

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी शनिवारी (दि. २) सुटीच्या दिवशी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (वायसीएम) येथे अचानक भेट देत विविध विभागांची पाहणी केली. यावेळी रुग्णालयातील आरोग्य सुविधा, उपचार व्यवस्था आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

आयुक्तांनी अतिदक्षता विभाग, नवजात शिशु अतिदक्षता विभाग, मेडिसिन, शस्त्रक्रिया, बालरोग, अस्थिरोग, कान-नाक-घसा, दंतचिकित्सा, अल्ट्रासोनोग्राफी, क्ष-किरण, डायलिसिस, बाह्यरुग्ण व आपत्कालीन विभागांसह उष्माघात कक्षाची पाहणी केली.

प्रत्येक विभागातील रुग्णसंख्या, उपचार पद्धती, उपलब्ध यंत्रणा आणि सेवा व्यवस्थेबाबत त्यांनी माहिती घेतली.

या भेटीदरम्यान आयुक्तांनी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांशी थेट संवाद साधून सेवा सुविधांबाबत अभिप्राय जाणून घेतला. बहुतांश रुग्णांनी उपलब्ध सेवांबाबत समाधान व्यक्त केले.

आरोग्य सेवा अधिक तत्पर, परिणामकारक आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. यावेळी अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार यांनी रुग्णालयातील विविध विभाग, मनुष्यबळ, सुविधा आणि भविष्यातील नियोजनाबाबत सादरीकरण केले.

# चार महिन्यांत २४ जणांचा मृत्यू

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** तालुक्यातील पर्यटनस्थळांवर पर्यटक पाण्यात बुडण्याच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ झाली असून, गेल्या १७ दिवसांतच ११ जणांचा मृत्यू झाला आहे. याआधी जानेवारी ते मार्च या कालावधीत १३ जणांचा बुडून मृत्यू झाला होता. परिणामी, वर्षातील अवघ्या चार महिने आणि तीन दिवसांत मृतांचा आकडा २४ वर पोहोचल्याने सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

उन्हाळ्याची सुट्टी आणि वाढत्या उष्णतेमुळे पर्यटक मोठ्या प्रमाणात धरणे, तलाव आणि नदीकाठांकडे आकर्षित होत आहेत. मात्र पाण्याची खोली, प्रवाहाचा वेग आणि भौगोलिक परिस्थिती यांचा अंदाज न आल्याने, तसेच निष्काळजीपणामुळे अपघात घडत आहेत. प्रशासनाच्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष केल्याने अनेकांना आपला जीव गमवावा लागत आहे.

पवना धरण, कासारसाई, कुंडमळा, आंद्रा धरण तसेच इंद्रायणी नदी परिसरात बुडण्याच्या घटना वारंवार समोर येत आहेत. काही ठिकाणी अचानक खोल खड्डे असून तर काही ठिकाणी पाण्याचा प्रवाह तीव्र असल्याने धोका अधिक वाढतो.

विशेषतः सेल्फी काढण्याच्या नादात धोकादायक ठिकाणी जाणे, मद्यप्राशन करून पाण्यात उतरणे, तसेच पोहता येत नसतानाही खोल पाण्यात जाणे या कारणांमुळे अपघातांची संख्या वाढत आहे. पर्यटकांकडून होत असलेला निष्काळजीपणा जीवघेणा ठरत असल्याचे स्पष्ट होत आहे.

# आरएमसी प्रकल्पांवर पालिकेची धडक कारवाई

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** शहरातील वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने आरएमसी (रेडी मिक्स काँक्रीट) प्रकल्पांवर विशेष तपासणी मोहीम हाती घेतली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चार प्रकल्पांवर सीलची कारवाई करण्यात आली आहे. पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडून ही मोहीम सातत्याने राबविली जात आहे.

महापालिकेच्या उपद्रव शोध पथकाने पुनावळे, मोशी आणि पिंपळे सौदागर परिसरातील एकूण १० आरएमसी प्रकल्पांची पाहणी केली. यापैकी चार प्रकल्पांमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्या. धूळ नियंत्रणासाठी आवश्यक यंत्रणा



कार्यरत नसणे, परिसरात स्वच्छतेचा अभाव तसेच कच्चा माल उघड्यावर साठविल्यामुळे मोठ्या प्रमाणात धूळ प्रदूषण होत असल्याचे निदर्शनास आले.

या पार्श्वभूमीवर मोशी येथील दोन, तसेच चिंचवड आणि पिंपळे सौदागर येथील प्रत्येकी एका प्रकल्पावर महापालिकेने सीलची कारवाई केली. उर्वरित प्रकल्पांना तातडीने धूळ नियंत्रणाच्या उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

प्रशासनाने स्पष्ट इशारा दिला आहे की, नियमांचे पालन न करणाऱ्या प्रकल्पांवर पुढील टप्प्यात अधिक कठोर कारवाई करण्यात येईल.

शहरातील आरएमसी प्रकल्पांसह बांधकाम आणि औद्योगिक प्रकल्पांवर सतत देखरेख ठेवली जात आहे. पर्यावरण विभागाकडून अशा तपासणी मोहिमा पुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असून, नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित वातावरण देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी सांगितले की, प्रदूषण नियंत्रणासाठी केवळ नियम बनविणे पुरेसे नसून त्यांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. नियमभंग करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई सुरूच राहणार आहे.

# एपीआय वैशाली तोटेवार यांचे निलंबन निश्चित

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पुणे :** आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत असताना तक्रारदाराची जमीन परत मिळवून देण्यासाठी २८ लाख रुपयांची लाच स्वीकारताना सहायक पोलीस निरीक्षक वैशाली मुरलीधर तोटेवार (वय ४९) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहाथ पकडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणानंतर पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा निर्णय घेतला असून, तोटेवार यांचे निलंबन निश्चित मानले जात आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराच्या अर्जावर वैशाली तोटेवार या तपास अधिकारी म्हणून काम पाहत होत्या. प्रकरणातील आरोपींवर कारवाई करून तक्रारदाराची जमीन परत मिळवून देण्यासाठी त्यांनी एकूण ३० लाख रुपयांची मागणी केली होती. यापैकी २ लाख रुपये त्यांनी आधीच स्वीकारले होते, तर उर्वरित २८ लाख रुपये स्वीकारण्याचे ठरविण्यात आले होते. या व्यवहाराची माहिती एसीबीला मिळाल्यानंतर त्यांनी सापळा रचण्याची योजना आखली.

दि. २ मे रोजी बंडगार्डन रोडवरील हॉटेल कॉनराडच्या गेटसमोर एसीबीने सापळा रचला. तोटेवार यांच्या सांगण्यावरून खासगी व्यक्ती संभाजी शिवाजी चव्हाण (वय ४७, रा. सदाशिव पेठ) यांनी तक्रारदाराकडून २८ लाख रुपये स्वीकारले. पैसे स्वीकारताच एसीबीच्या पथकाने तत्काळ कारवाई करत चव्हाण यांना ताब्यात घेतले आणि पुढील तपासात तोटेवार यांचाही सहभाग स्पष्ट झाल्याने त्यांनाही अटक करण्यात आली.

दरम्यान, वैशाली तोटेवार यांची मुंबई लोहमार्ग येथे पोलीस निरीक्षकपदी बदली करण्यात आली होती. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी त्यांना कार्यमुक्त करण्याचे आदेशही दिले होते. मात्र, प्रलंबित प्रकरणे हस्तांतरित करण्याची आवश्यक तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच त्यांनी लाचेचा व्यवहार केल्याने प्रशासनात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी त्यांचा कार्यमुक्ती आदेश रद्द करून थेट निलंबनाची प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रकरणात एसीबीने आर्थिक गुन्हे शाखेच्या कार्यालयात शोधमोहीम राबवून संबंधित फाईल आणि महत्त्वाची कागदपत्रे जप्त केली आहेत. आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोघांना ६ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

वैशाली तोटेवार या मूळच्या नागपूर येथील असून सध्या स्वारगेट पोलीस लाईनमध्ये वास्तव्यास होत्या. कार्यमुक्तीचा आदेश हातात असतानाही लाच स्वीकारण्याच्या या प्रकारामुळे पुणे पोलीस दलाच्या प्रतिमेला धक्का बसला आहे. या कारवाईमुळे लाचखोरीविरोधात कठोर संदेश गेला असून, भ्रष्ट अधिकाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

**फरार 'मोक्का' आरोपी जेरबंद**

**उरुळी कांचन :** येरवडा कारागृहातून थरारक पलायन करून तब्बल सहा वर्षे पोलिसांना गुंगारा देणाऱ्या 'मोक्का'खालील कुख्यात आरोपीला अखेर पुणे ग्रामीण दहशतवाद विरोधी पथकाने अटक केली आहे. अजिंक्य उत्तम कांबळे (वय ३१, रा. टिळेकरवाडी, ता. हवेली) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, डिसेंबर २०१९ मध्ये उरुळी कांचन येथील प्लॉटिंग व्यावसायिकाचे अपहरण करून २० लाख रुपयांची खंडणी उकळण्याच्या प्रयत्नात कांबळे आणि त्याच्या साथीदारांना अटक करण्यात आली होती.

जून २०२० मध्ये येरवडा कारागृहातील खिडकीचे गज काढून सहा आरोपींनी पलायन केले. या प्रकरणातील पाच आरोपींना पोलिसांनी अल्पावधीत अटक केली; मात्र मुख्य सूत्रधार कांबळे हा वेषांतर करून, नाव बदलून तसेच परराज्यात वास्तव्य करत पोलिसांच्या नजरेतून सतत बचाव करत होता.

# पिंपरीत भाज्यांच्या दरात घसरण; पालेभाज्या मात्र महाग

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** येथील लालबहादूर शास्त्री भाजी मंडईत रविवारी (दि. ३) गेल्या आठवड्याच्या तुलनेत भाजीपाल्यांच्या दरात काही प्रमाणात घसरण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. मात्र, उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे पालेभाज्यांची आवक कमी झाल्याने त्यांच्या दरात वाढ कायम आहे.

बाजारात भेंडी, गवार आणि शेवग्याच्या दरात घट झाली असून ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. कोथिंबीर व मेथीची जुडी ३० रुपयांना विक्री होत आहे. बीन्स व वाटाणा १०० ते १४० रुपये प्रतिकिलो दराने उपलब्ध आहेत, तर फ्लॉवर ३० ते ४० रुपये किलो दराने विक्री होत आहे. मिरची सुमारे ६० रुपये किलो असून कर्नाटक कैरी ५० ते ६० रुपये किलो दराने उपलब्ध आहे. कांदे १०० रुपयांना पाच किलो या दराने विकले जात आहे.

फळभाज्यांमध्ये गवार ४० ते ७० रुपये, शेवगा ४० ते ७० रुपये, टोमॅटो ३० रुपये, भेंडी ५० रुपये, फ्लॉवर ४० रुपये, कोबी ३० रुपये, मिरची ५० रुपये, गाजर ३० रुपये, शिमला मिरची ५० ते ६० रुपये, वांगी ३० ते ४० रुपये, काकडी ४० रुपये, कारले ५० रुपये, कांदे २० ते २५ रुपये आणि बटाटा २५ ते ३० रुपये किलो दराने विक्री होत आहे. तसेच पावटा ७० रुपये, लाल भोपळा ३० रुपये, घोसाळी ६० रुपये, दोडका ७० रुपये, तोंडली ५० ते ६० रुपये, बीट ५० रुपये, दुधी भोपळा ४० रुपये किलो दराने उपलब्ध आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### आंतरजातीय विवाहाच्या रागातून हल्ला

**वालचंदनगर** : आंतरजातीय विवाह केल्याच्या रागातून नातेवाईकांनीच एका कुटुंबावर घरात घुसून हल्ला केल्याची धक्कादायक घटना इंदापूर तालुक्यातील कळंब (लक्ष्मीनगर) येथे शनिवारी (ता. २) दुपारी साडेदोनच्या सुमारास घडली. या प्रकरणी वालचंदनगर पोलिसांनी सात जणांविरुद्ध गंभीर गुन्हे दाखल केले आहेत. याबाबत आरती चैतन्यमाळ शिकारे (वय २३) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी शशिकांत बापूराव निकाळजे, निलांबरी शशिकांत निकाळजे, निशिता शशिकांत निकाळजे, दीपाली प्रशांत शिंदे, कमल महादेव शिंदे, सुवर्णा आनंद निकाळजे आणि अश्विनी जयदेव सोरटे यांच्यावर गुन्हा नोंदवला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आरती चैतन्यमाळ शिकारे यांनी प्रेमविवाह केला असून हा आंतरजातीय विवाह नातेवाईकांना मान्य नव्हता. याच कारणावरून आरोपींनी त्यांच्या घरात घुसून धुमाकूळ घातला.

### तरुणावर कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला

**दौंड** : शहरातील संभाजीनगर परिसरात रविवारी (ता. ३) मध्यरात्री एका तरुणावर कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला अटक केली आहे. या हल्ल्यात राहुल गायकवाड हे गंभीर जखमी झाले आहेत. तर शाहीद मेहमूद शेख (रा. भीमनगर, दौंड) याला पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणी सोनी शाम जाधव (वय ३०, रा. गोवागल्ली, संभाजीनगर) यांनी दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सोनी शाम जाधव या त्यांच्या मावशी व भाऊ राहुल गायकवाड यांच्यासोबत रात्री सुमारे सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास घरासमोर बसल्या होत्या. त्यावेळी आरोपी शाहीद मेहमूद शेख हा पाठीमागून येऊन कोणतीही पूर्वसूचना न देता कुऱ्हाडीने राहुल यांच्या डोक्यावर सपासप वार केले.

### २.१८ लाख मताधिक्याने नवा इतिहास

# सुनेत्रा पवारांचा बारामतीत विक्रमी विजय

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बारामती** : बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी तब्बल २ लाख १८ हजार ९३० मतांच्या विक्रमी फरकाने विजय मिळवत देशात नवा इतिहास रचला. यापूर्वी उत्तरप्रदेशातील सुनील कुमार शर्मा यांच्या नावावर असलेला २ लाख १४ हजार ८३५ मताधिक्याचा विक्रम त्यांनी मागे टाकला असून बारामतीकरांनी देशातील सर्वाधिक मताधिक्याचा नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे.

दरम्यान, बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत विक्रमी विजय मिळाल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी कार्यकर्त्यांना संयम बाळगण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी हा विजय आदरणीय अजित पवार यांच्या पवित्र स्मृतींना समर्पित करत भावनिक प्रतिक्रिया व्यक्त केली.

सोशल मीडियावरील आपल्या पोस्टमध्ये सुनेत्रा पवार म्हणाल्या, “आज बारामती विधानसभा पोटनिवडणुकीचा निकाल जाहीर होत असताना आपण सर्वांनी आपल्या मतांमधून दाखवलेला विश्वास मी आदरणीय दादांच्या पवित्र स्मृतींना समर्पित करते. निकाल समोर येत असताना दादांच्या आठवणींना उजाळा मिळाल्याने आपण सर्वजण भावूक आहोत.” यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना स्पष्ट सूचना देत म्हटले की, “दादांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना नम्र विनंती आहे की, या विजयाचा जल्लोष म्हणून कुणीही मिरवणुका काढू नयेत किंवा गुलाल उधळू नये. आपण संयम राखूया आणि दादांच्या विचारांना साजेसं वर्तन करूया.”

सोमवारी (दि. ४) बारामती एमआयडीसीतील राज्य वखार महामंडळाच्या गोदामात सकाळी ८ वाजता मतमोजणीला सुरुवात होताच सुनेत्रा पवार यांनी पहिल्याच फेरीपासून आघाडी घेतली. फेरीनिहाय ही आघाडी वाढतच गेली आणि १८ व्या फेरीत त्यांनी २०१९ मध्ये अजित पवार यांनी केलेला १ लाख ६५ हजार २६५ मताधिक्याचा विक्रम मोडीत काढला. त्यानंतर प्रत्येक फेरीत मताधिक्य वाढवत त्यांनी अखेर ऐतिहासिक आघाडी नोंदवली.

या पोटनिवडणुकीत एकूण ५८.१७ टक्के मतदान झाले. एकूण ३ लाख ८४ हजार ५७९ मतदारांपैकी २ लाख २३ हजार ७०५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. निवडणुकीत २२ उमेदवार रिंगणात असतानाही सुनेत्रा पवार यांच्याविरोधातील सर्व उमेदवारांचे अनामत रक्कम जप्त झाली.

बारामतीत यापूर्वी अजित पवार यांनी मोठ्या फरकाने विजय मिळवला होता. त्यांच्या निधनानंतर ही पोटनिवडणूक जाहीर झाली. निवडणूक बिनविरोध करण्याचे प्रयत्न झाले होते; मात्र अपक्ष व लहान पक्षांच्या उमेदवारीमुळे लढत झाली.

प्रचारसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विक्रमी मताधिक्य देण्याचे आवाहन केले होते. बारामतीकरांनी त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत देशातील सर्व विक्रम मोडत नवा इतिहास घडवला. या निकालामुळे राज्याच्या राजकारणात बारामतीचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले असून महायुतीसाठी हा विजय निर्णायक मानला जात आहे.

## बाजरी वैरणीची वळई रचण्यात शेतकरी व्यस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात उन्हाळी बाजरी काढणी अंतिम टप्प्यात आली असून शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. यंदा पिकाची स्थिती चांगली राहिल्याने धान्यासह जनावरांसाठी उपयुक्त अशी वैरणही मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाली आहे.

पारगाव, शिंगवे, वळती, नागापूर, रांजणी, थोरांदळे, खडकी या भागांत दरवर्षी उन्हाळी हंगामात मोठ्या प्रमाणावर बाजरीची लागवड केली जाते. धान्याबरोबरच चाऱ्याचा दुहेरी फायदा मिळत असल्याने या पिकाला विशेष महत्त्व आहे. यंदा हवामान अनुकूल राहिल्याने उत्पादन चांगले झाले असून काढणीची कामे शेवटच्या टप्प्यात सुरू आहेत.

काढणीनंतर शेतांमध्ये सध्या बाजरीची वैरण गोळा करून वळई (रच) तयार करण्याची लगबग सुरू आहे. ही वैरण पावसाळ्यात जनावरांसाठी महत्त्वाचा चारा ठरणार असल्याने शेतकरी तिची साठवणूक करत आहेत.

दरम्यान, आंबेगावच्या पूर्व भागातील बाजरी वैरणीला इतर तालुक्यांतूनही मागणी वाढली आहे. बाहेरील शेतकरी येथे येऊन वैरण खरेदी करत असून सध्या दर सुमारे दोन हजार रुपये प्रति शेकडा असल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली.

एकूणच, यंदाच्या बाजरी हंगामामुळे शेतकऱ्यांना धान्यासह चाऱ्याचीही चांगली उपलब्धता झाल्याने आर्थिक दिलासा मिळाला असून आगामी पावसाळ्यासाठी जनावरांच्या चाऱ्याची चिंता काही प्रमाणात कमी झाली आहे.

## रांजणीत बैलगाडा शर्यतींचा जल्लोष; ४०० गाड्यांची धाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव** : आंबेगाव तालुक्यातील रांजणी येथे नरसिंह जन्मोत्सवानिमित्त दोन दिवस रंगलेल्या बैलगाडा शर्यतींना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शर्यतींमध्ये तब्बल ४०० बैलगाड्यांनी सहभाग नोंदवला, अशी माहिती यात्रा समिती व ग्रामस्थांनी दिली.

फळीफोड स्पर्धेत प्रथम क्रमांक चव्हाण बाबा बैलगाडा संघटना, देवांश अक्षय पोखरकर (माडीवाले) यांनी पटकावला. द्वितीय क्रमांक देवांश पोखरकर, स्वराज्य स्वप्निल कामठे, प्रदीप हनुमंत केदारी, मैत्री ग्रुप बाबाजी बोऱ्हाडे यांनी मिळवला. तृतीय क्रमांक निर्वद राहुल थोरात, देवांशराजे विक्रांत शेवाळे, शंकर गणपत कोकणे यांनी पटकावला, तर चतुर्थ क्रमांक शिवाजी विनायक मोरे, राहुल छबु साळुंके, तुषार शिवाजी झांबरे, तुषार पांडुरंग गायकवाड यांच्या बैलगाड्यांनी मिळवला.

पहिल्या दिवशी धोंडीभाऊ बारवे व संतोष पाचपुते यांनी ‘घाटाचा राजा’ हा किताब पटकावला. दुसऱ्या दिवशी किरण किसन सोलाट व रामशेठ गाढवे यांच्या बैलगाड्याने हा मान मिळवला. ‘घाटाचा महाराजा’ हा किताब दत्तात्रय भोर, धोंडीभाऊ बारवे व संतोष पाचपुते यांच्या जुगलबंदीला मिळाला.

स्पर्धेतील आकर्षक बारी म्हणून कुमजाई माता बैलगाडा संघटना (थोरांदळे), सोन्याभाऊ कानसकर व पांडुरंग किसन काळे यांच्या बैलगाड्यांचा गौरव करण्यात आला. या शर्यतींसाठी ग्रामस्थांनी एकूण ४ लाख ५१ हजार रुपयांची बक्षिसे ठेवली होती.

## भीमाशंकर अभयारण्यात प्राणी गणना

### निवडक ९ पाणवठ्यांवर गणना पार पडली

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भीमाशंकर** : श्री क्षेत्र भीमाशंकर अभयारण्यात बुद्ध पौर्णिमेचे औचित्य साधून वनविभागाच्या वतीने प्राणी गणना करण्यात आली. अभयारण्यातील नऊ निवडक पानवट्यांवर ही गणना पार पडली असून वन्यजीव अभ्यासक, निसर्गप्रेमी आणि वनअधिकाऱ्यांच्या सहभागातून संपूर्ण प्रक्रिया राबविण्यात आली.

संध्याकाळच्या अंधारात चंद्रप्रकाशात न्हालेल्या जंगलात शांततेत सुरू झालेल्या या गणनेदरम्यान विविध प्राणी-पक्ष्यांचे निरीक्षण करण्यात आले. उंच झाडांवरील मचानांवर बसून कोणतीही चाहूल लागू न देता पाणवट्यांकडे येणाऱ्या प्राण्यांचे बारकाईने निरीक्षण करण्यात आले. रातकिड्यांचा आवाज, पक्ष्यांचे संकेत आणि थंडगार वाऱ्याची साथ यामुळे उपस्थितांना एक आगळावेगळा अनुभव आला.

या वेळी सांबर, भेकर, रानडुक्कर, ससा, रानमांजर आदी प्राणी प्रत्यक्ष पाहायला मिळाले. मात्र कोणत्याही पानवट्यावर बिबट्याचे दर्शन झाले नाही. जंगलात इतरत्रही पाण्याची उपलब्धता असल्याने पानवट्यांवर प्राणी व पक्ष्यांची संख्या तुलनेने कमी असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले.

उपवनसंरक्षक केशव वाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय वन अधिकारी गवारी तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी रणजीत जाधव यांच्या उपस्थितीत ही गणना पार पडली. वनपाल, वनरक्षक आणि सुमारे २५ निसर्गप्रेमींनी सहभाग घेत प्राण्यांची माहिती संकलित केली.

घाटमाथ्यावरील या अभयारण्यात थंडगार वारे, धुक्याचे लोट आणि अंधार यामुळे गणनेदरम्यान काही अडचणींचा सामना करावा लागला. तरीही रात्रभर मचानावर बसून हालचाल न करता प्राण्यांचे निरीक्षण करण्याचा अनुभव सहभागींसाठी संस्मरणीय ठरला.

## गुजरातपर्यंत पाठलाग करत टोळी जेरबंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चाकण** : चाकण बाजारपेठेतील एका ज्वेलर्सच्या दुकानात २२ एप्रिलच्या रात्री परराज्यातील टोळीने धाडसी घरफोडी करत ७७ लाख २२ हजार रुपयांचा ऐवज व रोख रक्कम लंपास केली. या प्रकरणाचा छडा लावत पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट तीनने सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे गुजरातपर्यंत पाठलाग करून आरोपींना अटक केली असून ३० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी भरत सुमेरमल वंजारा (वय ३५, रा. विशाल पार्क, चाकण) यांनी नेहमीप्रमाणे दुकान बंद करून घरी गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी दुकानात आल्यावर चोरीचा प्रकार उघडकीस आला. दुकानातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख असा मोठा ऐवज चोरट्यांनी लंपास केल्याचे दिसून आले. याबाबत चाकण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तपासादरम्यान पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता आरोपी नाशिक मार्गे गुजरातकडे पसार झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांनी गुजरात गाठून सापळा रचत आरोपींना अटक केली. अटक करण्यात आलेल्यांमध्ये हिम्मतकुमार रोशनजी साळवी (३७), मुकेश उर्फ अजय भैरूलाल साळवी (२४), राधेश्याम भैरूलाल साळवी (२२) आणि पुखराज ओमप्रकाश लौहार (२१) यांचा समावेश आहे. चौकशीत आरोपींनी आपल्या साथीदारांसह कारने चाकणमध्ये येऊन ज्वेलर्सचे दुकान फोडल्याची कबुली दिली. या गुन्ह्यात सुमीत राजुभाई बंगाली आणि ‘कालू’ या साथीदारांचाही सहभाग असल्याचे समोर आले आहे.

तपासात आणखी धक्कादायक बाब समोर आली असून दुकानातील कामगार किशन रामलाल सोनी (२२, मूळ राजस्थान) याने आरोपींना दुकानाची माहिती व चावी उपलब्ध करून दिल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार आरोपींनी गॅस कटरच्या सहाय्याने आतील शटर तोडून दुकानात प्रवेश करत चोरी केली.

पोलिसांनी आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली कार, तसेच सोन्या-चांदीचे दागिने असा ३० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून उर्वरित ऐवजाचा शोध सुरू आहे. या कारवाईमुळे चाकण परिसरात खळबळ उडाली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

## थोरांदळे परिसरात तीव्र पाणीटंचाई; चारा पिके होरपळली



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील थोरांदळे परिसरात सध्या तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून त्याचा थेट फटका शेतीला बसत आहे. विशेषतः मळ्यांतील चारा पिके पाण्याअभावी अक्षरशः होरपळून जात असल्याने शेतकरी चिंतेत आहेत.

दरवर्षी उन्हाळ्यात या भागात पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. यंदा मात्र परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. थोरांदळे व परिसरासाठी पाण्याचा प्रमुख स्रोत असलेल्या डिंभे धरणाच्या डाव्या कालव्याची घोड शाखा सध्या कोरडी पडली आहे. परिणामी शेतीसाठी पाण्याचा पुरवठा पूर्णतः ठप्प झाला आहे. कालव्यातून पाणी न मिळाल्याने विहिरी व बोअरवेलवर ताण वाढला असून अनेक ठिकाणी पाण्याची पातळी लक्षणीयरीत्या घटली आहे. त्यामुळे चारा पिकांसह इतर पिके वाचवणे कठीण झाले आहे. यामुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे घोड शाखेत तातडीने पाण्याचे आवर्तन सोडण्याची मागणी केली आहे. अन्यथा येत्या काही दिवसांत परिस्थिती अधिक बिकट होईल, अशी भीती व्यक्त होत आहे.

## मंचर बाजार समितीत ८४४१ डाग आवक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर** : कृषी उत्पन्न बाजार समिती, मंचर येथे तरकारी शेतमालाची एकूण ८४४१ डाग इतकी मोठी आवक नोंदविण्यात आली असून, काही पिकांना हंगामातील उच्चांकी बाजारभाव मिळाल्याची माहिती सभापती निलेश थोरात यांनी दिली. विशेषतः फरशी या शेतमालाला दहा किलोला तब्बल १२१५ रुपये दर मिळाला, तर उन्हाळ्यामुळे वाढलेल्या मागणीच्या पार्श्वभूमीवर लिंबूला दहा किलोला १६०० रुपये असा उच्चांकी भाव मिळाला आहे.

उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे काही पिकांची आवक कमी तर काहींची मागणी वाढल्याने बाजारात दरांमध्ये चढ-उतार दिसून आला. मंचर बाजार समितीत विविध तरकारी शेतमालाचे दर पुढीलप्रमाणे नोंदविण्यात आले असून कंसात आवक दर्शविण्यात आली आहे : फरशी (२६) ५०० ते १२१५ रुपये, लिंबू (५) ५०० ते १६०० रुपये, गवार (३५६) ५० ते ६१० रुपये, घेवडा (३८) १०० ते ६०० रुपये, राजमा (२) ६०० ते ७०० रुपये, मिरची (३१८) ५० ते ५७० रुपये, अघोरा (६) ३५ ते ५० रुपये, आले (६) १५० ते ४५० रुपये, काकडी (९९१) १५ ते ३०० रुपये, कारले (१२५) ५० ते ३५० रुपये, कैरी (६४५) २० ते ३०१ रुपये, कोबी (२९०) ३० ते ८० रुपये, गाजर (५२) २० ते १५० रुपये, घोसाळी (३) १२० ते १३० रुपये, चवळी (४८) १०० ते ३०० रुपये, टोमॅटो (१०४) १८० ते ५५० रुपये, ढोबळी मिरची (२५१) ५० ते ३५० रुपये, तोंडली (६०) १०० ते ३५१ रुपये, दुधी भोपळा (१३६) २० ते २०० रुपये, दोडका (६४) २० ते ४०० रुपये, पापडी (१) २८० रुपये, फ्लॉवर (३२७०) १० ते १०० रुपये, बटाटा (११) ५० ते ७० रुपये, बीट (१११४) ३० ते २६० रुपये, भेंडी (१५८) ४० ते ३५० रुपये, मका (५३) ५० ते ११० रुपये, लसूण (२) ९०० रुपये, वांगी (२००) २० ते ३५० रुपये, वालवड (९) ३०० ते ४०० रुपये आणि शेवगा (२१) २०० ते ४०० रुपये दराने विक्री झाला.

एकूणच, उन्हाळ्याच्या हंगामात काही पिकांना चांगली मागणी मिळत असून शेतकऱ्यांना काही प्रमाणात समाधानकारक दर मिळत असल्याचे चित्र मंचर बाजार समितीत दिसून आले आहे.

### आंबेगावच्या पूर्व भागात शेतीकामांवर परिणाम

# कडाक्याच्या उन्हाने शेतमजूर झाले त्रस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव** : यंदाचा उन्हाळा तीव्र स्वरूपाचा ठरत असून आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील शेतमजूर प्रचंड उष्णतेमुळे त्रस्त झाले आहेत. एप्रिल-मे महिन्यात विविध शेतीकामांना वेग आला असला तरी वाढत्या तापमानामुळे काम करणे कठीण बनले आहे.

सध्या परिसरात कांदा काढणी, उन्हाळी बाजरी काढणी, फ्लॉवर व कोबी खुरपणीसह अन्य शेतीकामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. मात्र सकाळपासूनच उन्हाचा तडाखा जाणवत असल्याने मजुरांना कामाच्या वेळांमध्ये बदल करावा लागत आहे.

पूर्वी उशिरा सुरू होणारी कामे आता सकाळी ९ ते १० वाजताच सुरू केली जात असून दुपारपर्यंतच काम उरकण्याचा प्रयत्न केला जात आहे.

दुपारच्या सुमारास उष्णतेची तीव्रता प्रचंड वाढत असल्याने शेतात थांबणेही अवघड होत आहे. तापलेल्या वाऱ्यासह डोक्यावर कडक ऊन आणि सावलीचा अभाव यामुळे मजुरांची मोठी गैरसोय होत आहे. दिवसभर उन्हात काम करताना त्यांची दमछाक होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

स्थानिक शेतमजुरांच्या म्हणण्यानुसार, यंदाचा उन्हाळा मागील काही वर्षांच्या तुलनेत अधिक कडक असून सकाळपासूनच उष्णता असह्य होते. त्यामुळे काही ठिकाणी दुपारच्या वेळेत काम बंद ठेवून संध्याकाळी पुन्हा काम सुरू करण्याची पद्धत अवलंबली जात आहे.

दरम्यान, वाढत्या उष्णतेचा परिणाम पिकांवरही होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून एकूणच या कडाक्याच्या उन्हामुळे शेतीकामांवर ताण वाढला आहे. शेतमजुरांसाठी हा उन्हाळा मोठी परीक्षा ठरत आहे.

## ६७३ टँकर अनफिट; शहराच्या रस्त्यांवर धोक्याची घंटा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : बिबवेवाडी-कोंढवा रस्त्यावर भरधाव टँकरच्या धडकेत एका हॉटेल व्यावसायिकाचा मृत्यू झाल्यानंतर शहरातील टँकर सुरक्षेचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, पुण्यातील तब्बल ६७३ टँकरचे फिटनेस प्रमाणपत्र कालबाह्य झाले असूनही हे टँकर सर्रासपणे रस्त्यांवर धावत असल्याची माहिती समोर आली आहे.

या पार्श्वभूमीवर प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) संबंधित वाहनधारकांना तातडीने फिटनेस प्रमाणपत्र नूतनीकरण करण्याचे आवाहन केले आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांत शहरात पाणीटंचाई तीव्र होत असल्याने टँकरद्वारे पाणीपुरवठा मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यामुळे रस्त्यांवर टँकरची वर्दळ वाढलेली असते. मात्र, आरटीओच्या आकडेवारीनुसार, २,०९४ पाणी टँकरपैकी ३९१ टँकर अनफिट आहेत. याशिवाय, इतर मालवाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या २,२९२ टँकरपैकी २८२ टँकरचे फिटनेस प्रमाणपत्र संपलेले आहे. एकूण ४,३८६ टँकरपैकी ६७३ टँकर तांत्रिकदृष्ट्या अपात्र असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. आरटीओने स्पष्ट केले आहे की, फिटनेस प्रमाणपत्राशिवाय रस्त्यावर धावणाऱ्या टँकरवर कडक कारवाई केली जाईल.

## सारांश वृत्त

### केरळमध्ये भाजपचे तीन लक्षणीय विजय

**नवी दिल्ली:** २०२६च्या केरळ विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील 'यूडीएफ'ने विजय मिळवून सत्ता काबीज केली असली, तरी भारतीय जनता पक्षाने (भाजप) तीन जागा जिंकून राज्यात आपली लक्षणीय उपस्थिती दर्शवली आहे. भाजपने तिरुवनंतपुरममधील नेमम, कळकूट्टम आणि चथानूर या तीन मतदारसंघात विजय मिळवला आहे.

### केरळमध्ये मुख्यमंत्री कोण होणार?

**तिरुवनंतपुरम** : केरळमध्ये डाव्यांच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लावत काँग्रेसप्रणित 'संयुक्त लोकशाही आघाडी'ने विजय निश्चीत केला आहे. डाव्या लोकशाही आघाडीच्या सत्तेला सुरुंग लावत 'यूडीएफ' विजयाचा गुलाल उधळण्याच्या तयारीत असतानाच, आता राज्याचा पुढचा मुख्यमंत्री कोण? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. सध्याच्या चित्रानुसार, विधानसभेतील विरोधी पक्षनेते व्ही. डी. सतीशन यांचे नाव या शर्यतीत सर्वात आघाडीवर असल्याचे दिसत आहे. गेल्या पाच वर्षांपासून पिनाराई विजयन सरकारविरुद्ध आक्रमक भूमिका घेणारे व्ही. डी. सतीशन हे मुख्यमंत्रिपदाचे प्रबळ दावेदार मानले जात आहेत. ६० वर्षीय सतीशन हे २००१ पासून सलग पाच वेळा परावूर मतदारसंघातून निवडून आले आहेत.

### मुख्यमंत्री स्टालिन यांचा पराभव

**चेन्नई** : तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टालिन यांचा विधानसभा निवडणुकीत धक्कादायक पराभव झाला आहे. कोलाथूर मतदारसंघातून टीव्हीके पक्षाचे उमेदवार व्ही. एस. बाबू यांनी त्यांना धूळ चारली आहे. निवडणूक आयोगाच्या अधिकृत वेबसाईटनुसार, मतमोजणीच्या सहाव्या फेरीपासूनच व्ही. एस. बाबू यांनी मुख्यमंत्री स्टालिन यांच्यावर आघाडी घेतली होती. त्यानंतर बाबू यांनी आपली ही आघाडी शेवटपर्यंत कायम ठेवली. एम. के. स्टालिन यांना ७४,२०२ मते मिळाली आहेत. तर टीव्हीकेचे व्ही. एस. बाबू यांनी ८२,९९७ मते मिळवून ८,७९५ मतांच्या फरकाने विजय मिळवला.

## १५ वर्षांच्या तृणमूल सत्तेला धक्का, विक्रमी मतदान ठरले निर्णायक

# पश्चिम बंगालमध्ये भाजपचा ऐतिहासिक विजय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाने २०० जागांचा टप्पा पार करत ऐतिहासिक आघाडी घेतली असून तब्बल १५ वर्षे सत्तेवर राहिलेल्या तृणमूल काँग्रेसच्या पराभवाची चिन्हे स्पष्ट झाली आहेत. विशेष गहन पुनरावलोकन (एसआयआर) अंतर्गत मोठ्या प्रमाणात मतदार वगळल्यानंतर झालेल्या पहिल्याच निवडणुकीत हा निकाल लागल्याने राजकीय वाद अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेससमोर यावेळी भाजपकडून थेट आणि आक्रमक आव्हान उभे राहिले. या लढतीचे प्रमुख चेहरे म्हणून ममता बॅनर्जी आणि त्यांचे माजी सहकारी, सध्या



विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांच्यातील संघर्षाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. भवानीपूरसारख्या प्रतिष्ठेच्या मतदारसंघातील ही लढत विशेष चर्चेत राहिली. या निवडणुकीत काँग्रेस आणि डाव्या आघाडीनेही मैदानात उतरत अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न केला. तसेच, बाबरीच्या नावावर मशीद उभारण्याच्या वक्तव्यामुळे चर्चेत आलेले तृणमूलचे निलंबित आमदार हुमायूं कबीर यांनी स्थापन केलेल्या नव्या पक्षामुळे काही भागात राजकीय समीकरणांमध्ये चैतन्य निर्माण झाले.

राज्यात २३ आणि २९ एप्रिल रोजी दोन टप्प्यांत मतदान पार पडले. काही ठिकाणी, विशेषतः फाल्टा मतदारसंघातील काही मतदान केंद्रांवर अनियमिततेच्या तक्रारींमुळे फेरमतदानाचे आदेश देण्यात आले होते. कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत मतमोजणी पार पडत असून सुरुवातीपासूनच भाजपने आघाडी कायम ठेवली.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक २०२६ च्या मतमोजणीला सोमवार, ४ मे रोजी सकाळी ८ वाजता सुरुवात झाली असून राज्यात सत्तांतराची स्पष्ट चिन्हे दिसू लागली आहेत. सुरुवातीपासूनच भारतीय जनता पक्षाने आघाडी घेतली असून तृणमूल काँग्रेसला मोठा फटका बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या निवडणुकीत राज्यात विक्रमी ९२.९३ टक्के मतदान झाले होते. निवडणूक दोन टप्प्यांत पार पडली होती.

राज्यातील २९४ पैकी २९३ जागांसाठी मतदान पार पडले होते. बहुमतासाठी १४८ जागांची गरज असताना सुरुवातीच्या काही तासांतच भाजपने शंभरी पार केली आणि पुढे बहुमताचा टप्पाही ओलांडला. काही कलांनुसार भाजप २०० च्या आसपास जागांवर आघाडीवर असल्याचे चित्र दिसत असून तृणमूल काँग्रेस १०० च्या आतच मर्यादित राहण्याची शक्यता आहे.

या निवडणुकीत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यासमोर भाजपकडून कडवे आव्हान उभे राहिले होते. विशेषतः भवानीपूर मतदारसंघात ममता बॅनर्जी आणि सुवेंदू अधिकारी यांच्यात थेट लढत झाली. सुरुवातीच्या फेऱ्यांमध्ये अधिकारी आघाडीवर होते, तर नंतरच्या फेऱ्यांत ममता बॅनर्जी यांनी काही प्रमाणात आघाडी परत मिळवल्याचेही दिसून आले. संपूर्ण राज्यात कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत मतमोजणी सुरू असून टपाल मतपत्रिकांनंतर ईव्हीएमची मोजणी करण्यात आली. प्रचारादरम्यान बेरोजगारी, स्थानिक अस्मिता, तसेच विविध सामाजिक मुद्द्यांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये तीव्र संघर्ष झाला होता. मतमोजणीच्या सुरुवातीच्या कलांनुसार ग्रामीण व आदिवासी पट्ट्यात भाजपला चांगला प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले, तर काही शहरी भागांत तृणमूलने आपली पकड राखण्याचा प्रयत्न केला.

मतमोजणीला सकाळी ८ वाजता सुरुवात झाली. सुरुवातीला टपाल मतपत्रिकांची मोजणी झाल्यानंतर ईव्हीएममधील मतांची मोजणी सुरू करण्यात आली. प्रारंभी काही वेळ तृणमूल आणि भाजपमध्ये चुरशीची लढत दिसली; मात्र पुढील फेऱ्यांत भाजपने निर्णायक आघाडी घेतली.

राज्यातील प्रमुख लढतींमध्ये भवानीपूरसारख्या महत्त्वाच्या मतदारसंघात मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांच्यात काट्याची टक्कर झाली. सुरुवातीच्या फेऱ्यांमध्ये अधिकारी आघाडीवर असल्याचे दिसले, ज्यामुळे निवडणुकीचे राजकीय महत्त्व अधिक वाढले.

### पश्चिम बंगालमध्ये कमळ फुलले आहे!

● २०२६ ची पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक अविस्मरणीय ठरेल. जनशक्तीचा विजय झाला असून भाजपच्या सुशासनाच्या राजकारणाला येथील जनतेचा भरभरून आशीर्वाद मिळाला आहे. या ऐतिहासिक विजयाबद्दल मी बंगालमधील माझ्या बंधू-भगिनींचा मनापासून ऋणी आहे. जनता-जनार्दनाने भाजपला अभूतपूर्व कौल दिला आहे. मी त्यांना विश्वास देतो की, आमचा पक्ष पश्चिम बंगालमधील जनतेची स्वप्ने आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी कोणतीही कसर सोडणार नाही. आमचे डबल इंजिन सरकार समाजातील सर्व घटकांसाठी समान संधी आणि सन्मान सुनिश्चित करेल.

**- पंतप्रधान नरेंद्र मोदी**

## पुदुच्चेरी विधानसभेत एनडीएचा विजय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पुदुच्चेरी विधानसभा निवडणुकीत भाजपप्रणित एनडीएने पुन्हा एकदा दणदणीत विजय मिळवला. यंदाच्या निवडणुकीत इथे पुन्हा सत्ता मिळवणे हा केवळ राजकीय योगायोग नसून विविध घटकांच्या एकत्रीकरणातून आलेले परिणाम आहेत. भाजपची एआयएनआरसी सोबत युती पुन्हा एकदा मजबुतीने पुढे आली आहे. विद्यमान मुख्यमंत्री एन. रंगास्वामी यांची स्थानिक पातळीवरील विश्वासार्ह प्रतिमा, साधी शैली आणि जनसंपर्क यामुळे मतदारांमध्ये त्यांच्याबद्दल सकारात्मक भावना होती तर भाजपने संघटनात्मक पातळीवर प्रभावी प्रचार यंत्रणा उभी केली. स्थानिक नेतृत्वाला राष्ट्रीय पाठबळ दिले.

पुदुच्चेरी केंद्रशासित प्रदेश असल्यामुळे केंद्रातील सत्ताधारी पक्षाशी सुसंगत सरकार असेल तर अधिक निधी, विकास प्रकल्प आणि पायाभूत सुविधा मिळतील, असा विचार मतदारांमध्ये पेरण्यात एनडीएला यश आले. मागील कार्यकाळात आघाडी सरकारने तुलनेने स्थिर कारभार दिल्याने सत्ताविरोधी वातावरण निर्माण झाले नाही, जनतेचा विश्वास कायम ठेवण्यासाठी सरकारने प्रयत्न केले. देशात अनेक मुद्दे असताना स्थानिक मुद्द्यांवर एनडीएने ही निवडणूक खेळवली. त्यामुळे स्वाभाविकच स्थानिक मतदारांना एनडीए जवळचा पर्याय वाटला.

काँग्रेसप्रणित आघाडी संघटनात्मकदृष्ट्या कमकुवत आणि विस्कळीत असल्याचे या ठिकाणी जाणवले. स्थानिक पातळीवर प्रभावी आणि सर्वमान्य नेतृत्वाचा अभाव, अंतर्गत समन्वयातील त्रुटी धोरणात्मक स्पष्टतेचा अभाव यामुळे मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्यात त्यांना यश आले नाही. प्रचारातही ठोस भूमिका दिसली नाही. आघाडीतील वरिष्ठ नेत्यांनी प्रचाराकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप देखील होत आहे.

## तामिळनाडूत 'टीव्हीके'चा झंझावात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** तामिळनाडू विधानसभा निवडणूक २०२६ च्या मतमोजणीत अभिनेता विजय यांच्या नेतृत्वाखालील तमिळगा वेत्री कषगम (टीव्हीके) सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास येत इतिहास घडविण्याच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. राज्यातील २३४ मतदारसंघांपैकी टीव्हीके १०५ जागांवर आघाडीवर असून तिरंगी लढतीत पारंपरिक द्रविडीयन पक्षांना मोठा धक्का बसताना दिसत आहे.

मतमोजणीदरम्यान आतापर्यंत काही जागांचे निकाल जाहीर झाले असून उर्वरित २२९ जागांवर कल स्पष्ट



झाले आहेत. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रमुक) ५३ जागांवर आघाडीवर असून पाच जागांवर विजय मिळवला आहे. दुसरीकडे, ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम (एआयएडीएमके) ४५ जागांवर आघाडीवर आहे. पीएमके चार, काँग्रेस चार जागांवर आघाडीवर असून काँग्रेसने एका जागेवर विजय मिळवला आहे. भाजप तीन जागांवर आघाडीवर असून इतर पक्ष नऊ जागांवर आघाडीवर आहेत.

प्रमुख लढतींमध्ये मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन चेन्नईतील कोलाथूर मतदारसंघातून निवडणूक लढवत असून १५ फेऱ्यांनंतर ते टीव्हीकेचे उमेदवार व्ही. एस. बाबू यांच्यापेक्षा सुमारे सात हजार मतांनी मागे आहेत. उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन चेन्नईतील चेपॉक-तिरुवल्लिकेनी मतदारसंघातून सुमारे चार हजार तीनशे मतांनी आघाडीवर आहेत.

टीव्हीके प्रमुख विजय यांनी पेरंबूर आणि तिरुची पूर्व या दोन्ही मतदारसंघांत आघाडी कायम ठेवत पक्षाच्या दमदार पदार्पणाला बळ दिले आहे. तिरुची पूर्वमध्ये ते द्रमुकचे इनिगो इरुधाराज यांच्यापेक्षा सुमारे १३ हजार मतांनी आघाडीवर आहेत, तर पेरंबूरमध्ये ते द्रमुकचे आर. डी. शेखर यांच्यापेक्षा सुमारे २३ हजार मतांनी पुढे आहेत.

तामिळनाडूच्या राजकारणात दीर्घकाळ वर्चस्व राखणाऱ्या द्रमुक-एआयएडीएमके या द्वंद्वाला यावेळी मोठे आव्हान निर्माण झाले असून विजय यांच्या टीव्हीके पक्षाच्या उदयानंतर राज्यातील सत्तासमीकरणे आमूलाग्र बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## आसाममध्ये भाजपचा सलग तिसरा विजय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** आसाम विधानसभा निवडणूक २०२६ मध्ये भारतीय जनता पक्षाने दमदार कामगिरी करत सलग तिसऱ्यांदा सत्ता राखण्याचा मार्ग मोकळा केला आहे. सुरुवातीच्या कलांपासूनच भाजप आघाडीवर राहिला आणि अखेरीस स्पष्ट बहुमत मिळवत राज्यातील आपले वर्चस्व कायम ठेवले.

राज्यातील १२६ जागांसाठी मतदान ९ एप्रिल रोजी पार पडले होते. ८५ टक्क्यांहून अधिक मतदानाची नोंद झाली, जी राज्यातील उच्चांकी मतदानांपैकी एक मानली जाते. बहुमतासाठी ६४ जागांची गरज असताना भाजपने स्वतंत्रपणेच हा टप्पा पार केल्याचे चित्र समोर आले आहे. प्रारंभीच्या कलांमध्ये भाजप ७९ जागांवर आघाडीवर होता, तर काँग्रेस सुमारे २४ जागांवर पुढे असल्याचे दिसत होते. बोडोलँड पीपल्स फ्रंट (बीपीएफ) आणि असम गण परिषद (एजीपी) यांनीही काही मतदारसंघांमध्ये आघाडी घेतली होती. मात्र, मतमोजणी पुढे सरकताच भाजपने आपली आघाडी अधिक मजबूत केली. अंतिम निकालांनुसार भाजपने सुमारे ८० हून अधिक जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले असून राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) एकत्रितपणे बहुमताचा टप्पा सहज ओलांडला आहे. या विजयामुळे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा यांच्या नेतृत्वाला पुन्हा एकदा जनतेचा कौल मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे.

काँग्रेसला अपेक्षित पुनरागमन करण्यात अपयश आले असून विरोधकांमध्ये एकजुटीचा अभाव आणि विखुरलेली मते याचा फटका बसल्याचे दिसून आले. तर भाजपने विकास, पायाभूत सुविधा आणि प्रादेशिक मुद्द्यांवर भर देत मतदारांचा विश्वास टिकवून ठेवला. काही महत्त्वाच्या मतदारसंघांमध्येही भाजप उमेदवारांनी आघाडी घेत निर्णायक विजय मिळवले.

## डाव्यांचा बालेकिल्ल्यातच पराभव

# केरळमध्ये काँग्रेसचे पुनरागमन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केरळच्या राजकारणात १० वर्षांनंतर काँग्रेसने ऐतिहासिक पुनरागमन केले आहे. अंतर्गत कलह आणि गटबाजीसाठी ओळखल्या जाणाऱ्या काँग्रेसने यंदा अत्यंत शिस्तबद्ध रणनीती आखून डाव्या आघाडीचा (एलडीएफ) पराभव केला. राहुल गांधी यांची सक्रियता, तिकीट वाटपातील पारदर्शकता आणि प्रभावी सोशल इंजिनीअरिंगच्या जोरावर काँग्रेस प्रणित युनायटेड डेमोक्रेटिक फ्रंट (यूडीएफ) सत्तेत आला आहे. या विजयासह काँग्रेसची १० वर्षांची प्रतीक्षा संपली आहे. काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला, त्याने ८१ जागांवर विजय मिळवला आणि १६ जागांवर आघाडी घेतली, ज्याला मजबूत 'अँटी-इन्कम्बन्सी' लाटेचा फायदा झाला.

निवडणुकीच्या सुरुवातीला शशी थरूर यांच्या भूमिकेबाबत साशंकता होती. मात्र, राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खर्गे यांनी स्वतः चर्चा करून थरूर यांना प्रचार समितीचे सह-संयोजक केले. त्यानंतर थरूर यांनी केरळभर प्रचार केला. तसेच, खासदार सुधाकरन यांची नाराजी दूर करण्यासाठी ए. के. अँटनी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. यामुळे पक्षात एकजुटीचा संदेश गेला.

काँग्रेसने यंदा कोणत्याही खासदाराला विधानसभेच्या निवडणुकीत उतरवले नाही. मधुसूदन मिस्त्री यांच्या समितीने जुन्या चेहऱ्यांऐवजी तरुणांना संधी दिली. एलडीएफच्या आमदारांविरुद्ध फारशी अँटी-इन्कम्बन्सी नसतानाही, काँग्रेसने २५ लाख रुपयांच्या आरोग्य विम्याच्या हमीवर भर दिला, ज्याचा मोठा फायदा झाला.

काँग्रेसमध्ये अंतर्गत कलह अनेकदा दिसून येतो. मागील निवडणुकीतही तसेच झाले होते आणि पक्षाला विरोधी बाकांवर बसावे लागले होते. मात्र, यावेळी काँग्रेसने बंडखोरी टाळण्यासाठी ठोस रणनीती आखली. विद्यमान खासदारांना विधानसभेची तिकिटे न देता नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली. त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. तसेच, बंडखोर नेत्यांची समजूत काढण्यात आली. राहुल गांधी यांनी स्वतः त्यांची भेट घेतल्याने नाराजी मोठ्या प्रमाणात कमी झाली.

केरळमध्ये राहुल गांधी यांनी स्वतः प्रचाराची धुरा सांभाळली. मुख्यमंत्री पिनराई विजयन आणि भाजप यांच्यात 'छुपी युती' असल्याचा आरोप करत त्यांनी जोरदार प्रचार केला. के. सी. वेणुगोपाल यांनी बंडखोर नेत्यांची मनधरणी करून त्यांना पक्षाच्या मुख्य प्रवाहात आणले. त्यामुळे मतदानापूर्वी काँग्रेस एक शिस्तबद्ध आणि एकसंघ टीम म्हणून उभी राहिली.

काँग्रेसने मुस्लिम लीगसोबतच्या युतीमुळे मुस्लिम मतदारांना आकर्षित केले, तर सनी जोसेफ यांची प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करून ख्रिश्चन मतदारांनाही साद घातली. तसेच, के. सी. वेणुगोपाल, व्ही. डी. सतीशन आणि रमेश चेन्नीथला या नायर समाजातील नेत्यांमुळे भाजपच्या मतदारांमध्येही काँग्रेसने प्रभाव निर्माण केला. सलग दोन कार्यकाळ सत्तेत राहिलेल्या एलडीएफ सरकारविरुद्ध काही प्रमाणात नाराजी होती. भाजपने नायर मतदारांवर लक्ष केंद्रित केले होते; मात्र काँग्रेसने नायर समाजातील प्रमुख नेत्यांना मुख्यमंत्रीपदाचे संभाव्य दावेदार म्हणून पुढे करून ही रणनीती निष्फळ ठरवली.

## मे अखेरपर्यंत त्रि-सेवा संयुक्त ऑपरेशन्स सेंटर कार्यरत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** 'थिएटर कमांड' उभारणीपूर्वी संयुक्ततेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत मेअखेरपर्यंत देशात पूर्णपणे कार्यरत त्रि-सेवा संयुक्त ऑपरेशन्स सेंटर (जेओसी) सुरू होईल, अशी माहिती जनरल अनिल चौहान यांनी सोमवारी दिली.

दिल्लीस्थित जेओसीच्या माध्यमातून लष्कर, नौदल आणि हवाई दल यांच्यातील कार्यान्वयन नियोजन आणि युद्धभूमीवरील अंमलबजावणीचे एकत्रीकरण साधले जाणार आहे. यामुळे तिन्ही



दलांमध्ये समन्वय अधिक बळकट होणार आहे. यापूर्वी हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग यांनी दिल्लीत संयुक्त नियोजन आणि समन्वय केंद्र स्थापन करण्याची गरज व्यक्त केली होती. दिल्लीतील एका व्याख्यानात बोलताना जनरल चौहान यांनी सांगितले की, 'थिएटर कमांड' पुनर्रचनेबाबत तीन महत्त्वाच्या शिफारशी संरक्षण मंत्रालयाकडे पाठवण्यात आल्या आहेत. इंटिग्रेटेड थिएटर कमांड फ्रेमवर्कचे सुमारे ९० टक्के प्राथमिक काम पूर्ण झाले असून प्रस्ताव लवकरच उच्चस्तरीय मंजुरीसाठी सादर केला जाणार आहे.

संरक्षण दलांच्या 'व्हिजन २०४७' रोडमॅपनुसार अनेक आघाड्यांवर काम सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. संरक्षण अंतराळ संस्थेचा विस्तार, संरक्षण भू-स्थानिक एजन्सीची स्थापना, तसेच ड्रोन दल आणि 'कॉग्निटिव्ह वॉरफेअर ॲक्शन फोर्स' उभारणीसाठी आवश्यक आर्थिक मंजुरी मिळाली असून प्रक्रिया पुढे सरकत आहे. लष्कर, नौदल आणि हवाई दलासाठी स्वतंत्र कायद्यांच्या जागी 'कॉमन सर्व्हिसेस अॅक्ट' तयार करण्याचाही विचार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. याआधी इंटर-सर्व्हिसेस ऑर्गनायझेशन (कमांड, कंट्रोल अँड डिसिप्लिन) कायदा, २०२३ च्या माध्यमातून संयुक्ततेचा पाया मजबूत करण्यात आला आहे. पूर्ण-स्तरीय थिएटर कमांड्ससाठी अधिक व्यापक कायदेशीर चौकट आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तिन्ही दलांतील सेन्सर्सचे एकत्रीकरण करून हवाई संरक्षण अधिक सक्षम करण्यात आले आहे. तसेच संयुक्त संप्रेषण प्रणालीमुळे लष्कर, नौदल आणि हवाई दल यांच्यात अखंड डेटा प्रवाह शक्य झाला आहे. यामुळे भविष्यातील युद्धतंत्र अधिक परिणामकारक होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## ममता बॅनर्जींच्या पराभवाने हुमायून कबीर आनंदात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** कोलकाता पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद येथे बाबरी मशीद बांधण्याची घोषणा करणारे तृणमूल काँग्रेसचे माजी आमदार हुमायून कबीर ममता बॅनर्जी यांच्या पराभवामुळे आनंदात आहेत.

तृणमूल काँग्रेसकडून भाजपने सत्ता हिसकावून घेतल्यानंतर आनंद व्यक्त करताना त्यांनी 'जे झाले ते चांगलेच झाले' अशी प्रतिक्रिया दिली आहे. बाबरी मशिदीच्या बांधकामाची घोषणा केल्यानंतर टीएमसीने आपल्या हुमायून कबीर यांचीपक्षातून हकालपट्टी केली होती. हुमायून कबीर यांनी ममता बॅनर्जींच्या पक्षाचा पराभव केल्याबद्दल बंगालच्या जनतेचे अभिनंदन केले. टीएमसीच्या राजवटीत इंग्रजांपेक्षाही जास्त लूट झाली, असा आरोप त्यांनी केला. ते म्हणाले की, जे झाले ते चांगलेच झाले, हे तर होणारच होते. ममता बॅनर्जींनी तीन वेळा मुख्यमंत्री होऊन पुतण्याला इतकी ताकद दिली. लोकांची फसवणूक केली आणि लोकांचे पैसे लुटले. ब्रिटिशांनी जेवढे लुटले नसेल, तेवढे यांनी १५ वर्षांतच लुटले. आज मी बंगालच्या जनतेचे अभिनंदन करेन की त्यांनी लुटमार करणाऱ्या टीएमसीला चोख प्रत्युत्तर दिले आहे. टीएमसीच्या पराभवासाठी कारणीभूत असलेल्या घटकांमध्ये हुमायून कबीर यांचे नाव प्रामुख्याने घेतले जात आहे

## तमिळनाडूच्या राजकारणात 'किंगमेकर' म्हणून स्थान निर्माण केले

# अभिनेता विजय ठरला तमिळनाडूचा धुरंदर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** तमिळनाडूच्या विधानसभा निवडणुकीत चित्रपटसृष्टीतून राजकारणात आलेल्या थलापती विजय यांच्या 'तमिळगा वेट्री कळघम' (टीव्हीके) पक्षाने ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे.

सुरुवातीच्या कलानुसार विजय यांचा पक्ष ११० जागांवर आघाडीवर असून राज्यात सत्ता स्थापनेच्या दिशेने वाटचाल करत आहे. प्रस्थापित डीएमके आणि एआयएडीएमके या दोन्ही पक्षांना धक्का देत विजय यांनी तमिळनाडूच्या राजकारणात 'किंगमेकर' म्हणून स्थान निर्माण केले आहे. निवडणुकीत त्यांनी



दिलेली आश्वासने 'गेम चेंजर' ठरली आहेत.

निवडणूक प्रचारात विजय यांनी प्रामुख्याने १८ ते ३५ वयोगटातील तरुणांवर लक्ष केंद्रित केले. प्रस्थापित द्रविड राजकारणाला कंटाळलेला तरुण वर्ग विजय यांच्याकडे आशेचा किरण म्हणून पाहत आहे. विशेषतः महिला मतदारांमध्येही त्यांची मोठी लोकप्रियता दिसून आली. चित्रपट पडद्यावरील त्यांची 'लार्जर दॅन लाइफ' प्रतिमा त्यांना राजकारणात एम. जी. रामचंद्रन (एमजीआर) यांच्याप्रमाणेच यश मिळवून देताना दिसत आहे.

विजय यांच्या टीव्हीके पक्षाने काही ठोस आश्वासने दिली होती आणि त्याचा परिणाम निकालात दिसून आला. कुटुंबातील महिला प्रमुखांना दरमहा ₹२,५०० थेट मदत, कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील वधूसाठी ८ ग्रॅम सोने आणि एक दर्जेदार रेशमी साडी, मोफत गॅस सिलेंडर, युवकांसाठी मासिक भत्ता, इंटर्नशिप आणि स्पर्धा परीक्षांसाठी मोफत एआय-आधारित कोचिंग, शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी व आर्थिक मदत, शेतमजुरांना ₹१०,००० मदत, प्रति कुटुंब ₹२५ लाखांपर्यंत आरोग्य विमा, विधवा व दिव्यांगांना ₹३,००० मासिक पेन्शन आणि २०० युनिट मोफत वीज—या आश्वासनांनी मतदारांना आकर्षित केले.

विजय यांनी प्रचारादरम्यान सत्ताधारी डीएमकेवर थेट निशाणा साधला. त्यामुळे सरकारविरोधी मते एआयएडीएमकेकडे न जाता मोठ्या प्रमाणात टीव्हीकेकडे वळली. तसेच, त्यांनी द्रविड विचारसरणीवर थेट टीका न करता स्वतःला धर्मनिरपेक्ष पर्याय म्हणून मांडले, ज्याचा त्यांना मतांच्या ध्रुवीकरणात फायदा झाला. तमिळनाडूमध्ये यंदा सुमारे ८५.१ टक्के मतदानाची नोंद झाली, जी स्वातंत्र्यानंतरच्या उच्चांकी मतदानांपैकी एक मानली जाते.

विजय यांच्या या यशाची तुलना आता एमजीआर यांच्याशी केली जात आहे. एमजीआर जसे जनतेच्या मनातील नायक होते, तशीच प्रतिमा विजय यांनी उभी केली आहे.

चित्रपटांतून समाजसेवेचा संदेश देणारे विजय प्रत्यक्षातही लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी राजकारणात आले आहेत, असा विश्वास मतदारांमध्ये निर्माण झाला आहे.

चेन्नईत १९७४ मध्ये जन्मलेले जोसेफ विजय चंद्रशेखर यांचा प्रवास बालकलाकार म्हणून सुरू झाला. त्यांचे वडील एस. ए. चंद्रशेखर हे प्रसिद्ध दिग्दर्शक आहेत. १९९२ मध्ये 'नालैया थीरपू' या चित्रपटातून हिरो म्हणून पदार्पण करणाऱ्या विजय यांनी आता राजकारणातही मोठी झेप घेतली आहे. तामिळ जनतेने मोठ्या प्रमाणावर मतदान करून त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला आहे.